# कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखाना लि.,

हुपरी - यळगूड, ४१६ २०३, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर (महाराष्ट्र)
फोन (०२३०) २४५०४०२ ते ६, ई-मेल : kprjsssk@gmail.com वेबसाईट: www.kallappannaawadejawaharsssk.com

## -- ऊस पिक परिसंवाद --

कारखान्याच्या ऊस विकास योजनेअंतर्गत
**“बदलत्या हवामानामध्ये ऊस उत्पादन वाढीसाठी उपाय”**
या विषयावर ऊस पिक परिसंवाद आयोजित केला आहे.

**- कार्यक्रमाचे अध्यक्ष –**
**मा. डॉ. श्री. राहूल आवाडे,**
केन कमिटी चेअरमन

**- प्रमुख मार्गदर्शक -**
**मा. श्री. सुरेश माने-पाटील**
(निवृत्त शास्त्रज्ञ, वसंतदादा शुगर इन्स्टिटट्यूट, पुणे)

**- प्रमुख उपस्थिती -**
**मा.श्री. बाबासो चौगुले**
व्हाईस चेअरमन

**मा.श्री.आण्णासो गोटखिंडे**
संचालक

**मा.श्री. सूरज बेडगे**
संचालक

तेंव्हा या कार्यक्रमास आपण अगत्यपूर्वक उपस्थित रहावे, ही नम्र विनंती.

**- स्वागतोत्सुक -**

**जयपाल गिरीबुवा**
सि. ॲग्री ओव्हरसियर,
(हुपरी विभाग)

**भास्कर पट्टणकुडे**
उपमुख्य शेती अधिकारी

**किरण कांबळे**
मुख्य शेती अधिकारी

**कार्यक्रमाची वेळ** : शनिवार दि. २९/०४/२०२३ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता.

**स्थळ** : श्री. कल्लेश्वर मंदीर हॉल, **पट्टणकोडोली.**


ऊस पिक परिसंवा







शिरीष आवटे

पुढारी

# पट्टणकोडोली येथे जवाहर साखर कारखान्याचा ऊस परिसंवाद उत्साहात

**पट्टणकोडोली : पुढारी वृत्तसेवा**

देशात साखर निर्यातीत सर्वात आघाडीवर असणाऱ्या कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर सहकारी साखर कारखान्याने शेतकऱ्यांनी ऊस उत्पादकता कशी वाढवावी, आर्थिक स्थैर्य कसे वाढवावे, जमिनीची सुपीकता कशी वाढवावी यासाठी पुण्यातील वसंतदादा इन्स्टिट्यूटचे निवृत्त शास्त्रज्ञ सुरेश माने-पाटील यांचे व्याख्यान आयोजित केले होते.

यावेळी माने-पाटील म्हणाले, बिघडलेल्या जमिनीत ०२६५ आणि निचऱ्याच्या चांगल्या जमिनीत को. ८६०३२ उसाची लागण करावी. को ८६०३२ हा ऊस शेतकऱ्यांच्या फायद्याचा आहे. एकरी १०० ते १५० टन उत्पादन देण्याची क्षमता याच जातीमध्ये आहे. ऊस शास्त्राच्या भाषेत ऊस शेतीच्या सऱ्यात उतार असणे गरजेच आहे. उसात आंतरपीक म्हणून मका, सूर्यफूल घेऊ नका. यासह औषध फवारणी, कोणती लागवड (खाद्य) किती प्रमाणात द्यावी आणि किती दिवसांच्या अंतराने द्यावी याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे नियोजन पट्टणकोडोली मंडलाचे युवराज पाटील, अविनाश मोरे, धुळगोंडा मोठे, अनिल माळी यांनी केले. कार्यक्रमास प्रगतशील शेतकरी प्रकाश पाटील, कारखान्याचे उपाध्यक्ष बाबासो पाटील, संचालक, मुख्य शेती अधिकारी किरण कांबळे, अभयकुमार मगदूम, धुळा डावरे, कृष्णात बाणदार उपस्थित होते.




**पट्टणकोडोली : येथे ऊस पीक परिसंवादात मार्गदर्शन करताना शास्त्रज्ञ सुरेश माने-पाटील. समोर उपस्थित ऊस उत्पादक व अन्य.**

My Kolhapur Edition
May 1, 2023 Page No. 5
newspaper.pudhari.co.in



...क बाजारपेठ सर्व व्यवहार

## ...प्रतिसाद

...कांनी जातीय तेढ निर्माण
...ना शिक्षा देण्यासाठी
... समाजकंटकांनी छत्रपती
...क तेढ निर्माण करण्याचा
... हिंदू समाज बांधवांनी
...ामस्थांनी आपले सर्व
...ाव येथेही बंदला
...षेध फेरी काढून हेरले
...जातीय तेढ निर्माण
...त्यांना शिक्षा देण्याची

## ... विलास पाटील

... अखिल भारतीय
...कोष्याध्यक्षपदी निवड
...ण्णा आवाडे जवाहर
...टंट म्हणून कार्यरत
...त्मिक प्रवचने दिली
...वेळी मंत्री शंभुराज

# पट्टणकोडोली येथे जवाहर साखर कारखान्याचा ऊस परिसंवाद उत्साहात

**पट्टणकोडोली : पुढारी वृत्तसेवा**

देशात साखर निर्यातीत सर्वात आघाडीवर असणाऱ्या कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर सहकारी साखर कारखान्याने शेतकऱ्यांनी ऊस उत्पादकता कशी वाढवावी, आर्थिक स्थैर्य कसे वाढवावे, जमिनीची सुपीकता कशी वाढवावी यासाठी पुण्यातील वसंतदादा इन्स्टिट्यूटचे निवृत्त शास्त्रज्ञ सुरेश माने-पाटील यांचे व्याख्यान आयोजित केले होते.

यावेळी माने-पाटील म्हणाले, बिघडलेल्या जमिनीत ०२६५ आणि निचऱ्याच्या चांगल्या जमिनीत को. ८६०३२ उसाची लागण करावी. को ८६०३२ हा ऊस शेतकऱ्यांच्या फायद्याचा आहे. एकरी १०० ते १५० टन उत्पादन देण्याची क्षमता याच जातीमध्ये आहे. ऊस शास्त्राच्या भाषेत ऊस शेतीच्या सऱ्यात उतार असणे गरजेच आहे. उसात आंतरपीक म्हणून मका, सूर्यफूल घेऊ नका. यासह औषध फवारणी, कोणती लागवड (खाद्य) किती प्रमाणात द्यावी आणि किती दिवसांच्या अंतराने द्यावी याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे नियोजन पट्टणकोडोली मंडलाचे युवराज पाटील, अविनाश मोरे, धुळगोंडा मोठे, अनिल माळी यांनी केले. कार्यक्रमास प्रगतशील शेतकरी प्रकाश पाटील, कारखान्याचे उपाध्यक्ष बाबासो पाटील, संचालक, मुख्य शेती अधिकारी किरण कांबळे, अभयकुमार मगदूम, धुळा डावरे, कृष्णात बाणदार उपस्थित होते.




**पट्टणकोडोली : येथे ऊस पीक परिसंवादात मार्गदर्शन करताना शास्त्रज्ञ सुरेश माने-पाटील. समोर उपस्थित ऊस उत्पादक व अन्य.**



कोल...
डॉ. ...

दैनिक रोखठोक व्हिजन

दैनिक नव्हे, लढवय्या सैनिक

सौरभ बिरांजे

०१.०५.२०२३


# प.कोडोलीत जवाहर कारखान्याच्या वतीने ऊस परिसंवाद

हुपरी :सौरभ बिरांजे

प.कोडोली ता.हातकणंगले येथे कल्लाप्पाण्णा आवडे जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखाना हुपरी यांच्या वतीने ऊस उत्पादन वाढविण्यासाठी ऊस उत्पादन परीसंवाद घेण्यात आला .या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून वसंतदादा शुगर इन्स्टिटयूट पुणे चे निवृत्त शास्त्रज्ञ सुरेश माने-पाटील होते.



पारंपारिक शेतीला फाटा देऊन शेतकऱ्यांना नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती व्हावी, आधुनिक शेती करून शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती व्हावी या उद्देशाने हा कार्यक्रम घेण्यात आला . या कार्यक्रमाचे अध्यक्ष गावचे प्रगतशील शेतकरी प्रकाशकाका पाटील होते. सुरेश माने पुढे बोलताना असे म्हणाले की, पश्चिम महाराष्ट्र हा ऊस पिकासाठी प्रसिद्ध आहे.त्यामुळे येथील शेतकरी उसाचे उत्पादन प्रामुख्याने घेतो. यासाठी शेतकऱ्यांनी योग्य नियोजन

(उर्वरित पान ४ वर...)

## प.कोडोलीत जवाहर...

लावून शेतीची योग्य मशागत, बी-बियाणांची योग्य निवड, बेणे प्रक्रिया, योग्य हंगाम ,दोन सरीतील अंतर , झ्रजी यू आकारा प्रमाने सरी, पाण्याचा योग्य निचरा, जमिनीचा उतार , तीन वर्षातून एकदा माती परीक्षण,तण नाशकांचा योग्य मारा ,बिट,कांदा,शेंग,यासारखीआंतरपीक घेणे, एकात्मिक खतांचे नियोजन अशा आधुनिकतेचा वापर करून ऊस उत्पादन एकरी १२० ते १४०० टन उत्पादन घेऊन स्वतःचा व कारखान्याचा आर्थिक विकास साधावा. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत कारखान्याचे मुख्य शेती अधिकारी किरण कांबळे यांनी केले. .या कार्यक्रमासाठी कारखान्याचे व्हाईस चेअरमन बाबासो चौगुले, संचालक अण्णासो गोडखिंडे, सुरज बेगडे, शेती अधिकारी जयपाल गिरीबुवा, भास्कर पट्टणकुडे, युवराज पाटील, नवमहाराष्ट्र सूतगिरणीचे संचालक गोगा बामंदार, वडगाव बाजार समितीचे सदस्य धुळा डावरे, पंकज पाटील,अमित चौगुले, धुळा मोठे, अविनाश मोरे, अनिल माळी, निम्मगोंडा पाटील, संजय पाटील, व पट्टणकोडोली पंचक्रोशीतील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार जवाहर साखर कारखान्याच्या माजी संचालक धनंजय मगदूम यांनी मानले.